थोडक्यात

पाच मेयर फेलोची मागणी

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): मुख्यमंत्री फेलोच्या धर्तीवर महापालिकेने १६ मेयर फेलोची निवड केली आहे. दोन महिन्यांत त्यांनी समाधानकारक काम केल्यामुळे आता स्मार्ट सिटीसाठी आणखी पाच मेयर फेलोची मागणी औरंगाबाद फर्स्ट या संघटनेकडे करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. निपुण विनायक यांच्या संकल्पनेतून मेयर फेलोची निवड करण्यात आली. गुणवंत विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या आवडीनुसार विभागवार मेअर फेलो देण्यात आले आहेत. आता स्मार्ट सिटी योजनेसाठीदेखील पाच मेयर फेलो मिळावेत, अशी मागणी औरंगाबाद फर्स्ट या संघटनेकडे करण्यात आली अहे.

मुलावर प्राणघातक हल्ला

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): माझ्या तोंडावर बॅटरी का चमकावली असे म्हणत एकाने आपल्या साथीदारांच्या मदतीने अल्पवयीन मुलास शिवीगाळ करून बेदम मारहाण केली. ही घटना ३ नोव्हेंबर रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास सिटी चौकातील पावर हाऊस मागे घडली. याप्रकरणी मुसा खान समशेर खान उर्फ नवाब (रा. सिटी चौक परिसर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून फारेज पैसल चाऊस, रा.शहागंज याच्याविरूध्द सिटी चौंक पोलिस ठाण्यात प्राणघातक हल्ला केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक ए.डी.नागरे तपास करीत आहेत.

सावकारावर गुन्हा दाखल

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): कोऱ्या बाँड पेपरवर व कोऱ्या कागदावर सही घेऊन त्याचा गैरवापर करणाऱ्या सावकारावर वेदांतनगर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व्यापारी आनंद नेमीचंद सुराणा (वय ३७, रा. उल्कानगरी) यांनी शैलेश जयमल संचेती (वय ४५, रा. राजाबाजार), चेतन रमेश गादिया या दोघांच्या विरोधात तक्रार दिली आहे. सुराणा यांनी संचेतीकडून एक लाख रुपये कर्ज घेतले होते. ३१ जानेवारी २०१५ रोजी हे सर्व पैसे परत केले. त्या वेळी सही केलेला कोरा कागद आणि बाँडपेपर सुराणा यांनी परत मागितले. तेव्हा संचेतीने टाळाटाळ केली. त्याच्याकडे असलेल्या बाँड आणि कागदाचा वापर करून रोहाऊसची इसारपावती केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक बनकर करत आहेत.

लोकशाही दिनी ११ तक्रारी दाखल

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): जिल्हाधिकारी कार्यालयात ५ नोव्हेंबर रोजी उपजिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण ११ तक्रारी दाखल झाल्या.त्यामध्ये जिल्हा परिषद–१, महसूल विभाग– ५, पाटबंधारे विभाग – १, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण – १ , पोलिस विभाग – २, इतर विभाग –१ अशा एकूण ११ तक्रारी दाखल झाल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

सेवापुस्तिका ऑनलाईन करण्यासाठी कक्ष स्थापन करण्याची मागणी

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): शिक्षकांच्या सेवापुस्तिका ऑनलाईन करण्यासाठी शिक्षणाधि–कार्यांच्या कार्यालयात कक्ष स्थापन करा, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या शिष्टमंडळाने केली. जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांना सोमवारी विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष प्रकाश दाणे, राज्य संपर्क प्रमुख संतोष ताठे, सुनील चिपाटे, महेंद्र बारवाल, राजेश भुसारी, मच्छिंद्र शिंदे, रमेश जाधव, प्रवीण संसारे, विजय ढाकरे, शशी मघाडे, रउफ शेख, किशोर कदम, विनोद पवार आदींचा समावेश होता.

सेवापुस्तिका अद्ययावत करण्यासाठी

जि.प.मध्ये आता स्वतंत्र कक्ष

औरंगाबाद, दि. १० (सांजवार्ता ब्युरो): जिल्हा परिषद शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका ऑनलाईन करण्यासाठी दलालांनी जिल्हाभर धुमाकूळ घातला आहे.

यामुळे शिक्षक व जि.प.चे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. तो दूर करावा असे प्रतिपादन जि.प. शिक्षक, संघटना पदाधिकारी व इतर कर्मचाऱ्यांनी केली असल्याने सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांनी तंत्रस्नेही शिक्षकांच्या माध्यमातून सेवापुस्तिका ऑनलाईन केल्या जातील, असे

जि.प. प्रशासनाचा निर्णय

आश्वासन दिले.

सेवाकाळ वाढीनुसार शिक्षकांची आर्थिक लूट केली जात आहे, असा आरोप शिक्षक भरती संघटनेच्या शिष्टमंडळाने केला होता. यावर जि.प. अध्यक्षा अँड. देवयानी डोणगावकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), शिरीष बनसोडे, वित्त व लेखा अधिकारी अप्पासाहेब चाटे यांनी सेवापुस्तिका अद्ययावत करण्यासाठी तंत्रस्नेही शिक्षकांच्या माध्यमातून स्वतंत्र कक्ष स्थापन करून काम करण्याचे निश्चित केले आहे.

महापालिकेमध्ये भाजपचे नगरसेवकांनी आयुक्त डॉ. निपुण विनायक यांची भेट घेऊन शहरातील पाणीप्रश्नाबाबत चर्चा केली. त्याप्रसंगी आ. अतुल सावे, किशनचंद तनवाणी व नगरसेवक.

तरुणीस आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्याचा व्हिसा रद्द करा

नातेवाईकांची पोलिस आयुक्तांकडे मागणी

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरूणीस आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीचा आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीचा आणि पासपोर्ट रद्द करून त्याला अटक करा अशी मागणी मयत तरूणीच्या नातेवाईकांनी केली आहे. मयत सोनल मिभराव गायकवाड हिच्या नातेवाईकांनी पोलिस आयुक्त चिरंजीव प्रसाद यांची भेट घेवून त्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

मुळची नांदेड जिल्ह्यातील भोकर येथील रहिवासी असलेली सोनल मिभराव गायकवाड (वय २४) ही तरूणी आपल्या मैत्रिणीसोबत रूम करून एकनाथनगर भागात राहत होती. सोनलचा नातेवाईक असलेल्या किरण भीमराव कोलते याच्यासोबत विवाह करण्यासाठी दोन्ही कुटुंबियांकडून लग्नाच्या बोलाचाली सुरू होत्या. त्यावेळी किरण कोलते कुटुंबियांकडून हुंड्यासाठी अवास्तव मागणी केल्या जात होती. त्यामुळे सोनल प्रचंड मानसिक तणावाखाली आली होती.

दरम्यान, १३ ऑगस्ट २०१८ रोजी सोनल गायकवाड हिने आपली मैत्रिण बाहेर गेल्यावर खोलीतील पंख्याला दोरीने बांधुन गळफास घेतला होता. या प्रकरणी सोनलची बहिण आशा सितळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सोनल गायकवाडचा भावी पती किरण मिभराव कोलते, सत्यशिला मिभराव कोलते, गौतम माणिका सोनटक्के यांच्याविरूध्द उस्मानपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु, उस्मानपुरा पोलिसांकडून कोणतीच कारवाई होत नसल्याने सोनलची बहिण आशा सितळे, आई शांताबाई मिभराव गायकवाड, भाऊ संदीप मिभराव गायकवाड यांनी सोमवारी पोलिस आयुक्त चिरंजीव प्रसाद यांची भेट घेऊन कारवाई करण्याची मागणी केली.

नागरिकांनी सतर्क राहण्याचे पोलिसांचे आवाहन

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): दिवाळीनिमित्त सुट्टया असल्याने अनेक चाकरमंडळी घरांना कुलूप ठोकून आपल्या गावी जातात, हिच संधी साधत चोरटे घरफोडी करतात. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन अजिंठा आणि फर्दापूर पोलिसांनी केले आहे. सुट्टयात बाहेरगावी जातानाा नागरिकांनी दागीने, पैसे आदी मौल्यवान वस्तू घरात ठेवू नयेत, त्या काळजीपूर्वक सोबत घेऊन जाव्याक. आपण घराला कुलूप लावून बाहेरगावी जात असल्यास आपल्या शेजाऱांना सांगावे. तसेच किती दिवसांसाठी कोठे जात आहात याविषयी पोलिसांनाही माहिती द्यावी, काही संशयास्पद वस्तू किंवा व्यक्ती दिसल्यास कळवावे, असे आवाहन अजिंठा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक किरण आहेर,फर्दापूर ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शरद जन्हाड, पोलिस नाईक अजित शेकडे,आर.आर.काकडे यांनी केले आहे.

खूनप्रकरणी चार आरोपींना अटक

औरंगाबाद,दि. १० (सांजवार्ता ब्युरो): नवरात्रोत्सवात दुर्गामातेच्या विसर्जनासाठी गेलेल्या बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह दि. २० ऑक्टोबर रोजी संशयास्पद स्थितीत आढळला होता. तपासात तो मृत्यू नैसर्गिक नसून खून असल्याचा उलगडा करण्यात पिशोर पोलिसांना यश आले. याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करून चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मथाजी लक्ष्मण बनसोडे (वय ५०, मूळ गाव लहानेचीवाडी, ता. फुलंब्री. ह. मु. चिंचोली लिंबाजी) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पिशोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार चिंचोली (लिं.) येथील मजुरीसाठी आलेल्या मथाजी बनसोडे यांचा आरोपी राजू नारायण बावस्कर याच्याशी १९ ऑक्टोबर रोजी वाद झाला. त्यामुळे मयत मथाजी बनसोडे यांनी राजू बावस्करच्या शेतातील इलेक्ट्रिकल वायर व फ्युजची तोडफोड केली.

हा राग मनात धरून इतर तीन जणांच्या मदतीने मंगलमूर्ती राजहंस याचे शेतात (गट क्र.५७) चार जण गेले. येथे या आरोपींनी मथाजी बनसोडे यांना दारू पाजून काठी आणि इलेट्रिक वायरने मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले. दुसऱ्या दिवशी शेतात काम करणाऱ्या मजुरांना गंभीर जखमी अवस्थेत मथाजी बनसोडे आढळून आले असता त्यांना दवाखान्यात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. दरम्यान, याप्रकरणी २० ऑक्टोबर रोजी पिशोर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

यानंतर सहायक पोलीस निरीक्षक जगदीश पवार, पोलीस उपनिरीक्षक जयराज भटकर, पोहेकॉं तुपे, पोना देवकर, कनकुटे, पोकॉं देशमुख यांनी अधिक तपास केला असता मयताच्या शरीरावरील मारहाणीच्या खुणा, तसेच यातील एक आरोपी विलास मगरशी मयताच्या पत्नीचे अनैतिक संबंध असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. यावरून पोलिसांनी राजू बावस्कर आणि विलास मगर यांना ताब्यात घेतले. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. या दोघांना या कामी पंडित विश्वनाथ पवार, संजय देवबा पवार यांनी मदत केली. याप्रकरणी सपोनि जगदीश पवार यांच्या फिर्यादीवरून सोमवारी चारही आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

चिकलठाणा येथे कचरा सयक्रीशन मशिनच्या शुभारंभप्रसंगी महापौर नंदकुमार घोडेले, स्थायी समितीचे सभापती रेणुकादास वैद्य, सभागृह नेते विकास जैन, विरोधी पक्षनेते जमीर कादरी, मनपा आयुक्त डॉ. निपुण विनायक, नगरसेवक राजू शिंदे, गोकुळ मलके, मकरंद कुलकर्णी, अतिरिक्त आयुक्त श्रीकृष्ण भालसिंग, महावीर पाटणी आदी.

पैशासाठी तोडफोड

औरंगाबाद, दि.१० (सांजवार्ता ब्युरो) : पैशाची मागणी करत महिलेच्या घरात घुसून सामानाची तोडफोड केल्याची घटना क्रांती चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५ नोव्हेंबर रोजी रात्री साडेअकरा वाजता घडली. महिलेने तक्रारीत म्हट्ल्यानुसार गजू यादव, विजू यादव यांनी त्यांच्या घरात घुसून पैशाची मागणी करत त्यांच्या कपाटाची काच फोडली. त्यानंतर कपाटातील कपडे खाली फेकले. तसे त्यांच्या पतीला मारहाणही केली. महिलेच्या तक्रारीवरून क्रांती चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नियंत्रण सुटल्याने कंटेनर नदीत कोसळला

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): चारचाकी वाहने घेऊन जाणाऱ्या कंटेनर चालकाचा ताबा सुटल्याने वाघूर नदीत कोसळल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली. प्रसंगावधान राखून नदीत उड्या मारल्याने चालक व अन्य एकाचा जीव बचावला.

औरंगाबादहून शोरूमचे नवीन चारचाकी वाहने घेऊन जळगावकडे जात असलेला कंटेनर (क्र.एनएल ०१/एबी ४७५९) मध्यरात्री अडीचवाजण्या सुमारास औरंगाबाद–जळगाव महामार्गावरील अजिंठाजवळ असलेल्या वाघूर नदीच्या कमकुवत पुलाजवळ नदीत कोसळला. काही क्षणात चालक इसाअली मोहम्मद व सोबतच्या वाहकाने पाण्यात उड्या मारल्या. दोघेही पोहत बाहेर पडले. या दुर्घटनेत कंटेनरच्या समोरच्या भागाचे मोठे नुकसान झाले. कंटेनर पूर्णपणे पाण्यात बुडाला. सहायक पोलिस निरीक्षक किरण आहेर, हेमराज गिरी व विकास चौधरी यांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली.

सदोष विद्युत मीटरमुळे नागरिक हैराण

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो) : महावितरण कार्यालयात चार महिन्यांपूर्वी शहरासाठी जवळपास एक लाख विद्युत मीटर आले होते. मात्र सदरचे मीटर हे सौजन्य योजनेतील वीज ग्राहकांसाठी वापरण्यात आल्यामुळे सदोष (फॉल्टी) मीटरधारक ग्राहकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. या ग्राहकांना विनाकारण फाल्टी मीटरचा भुर्दंड सोसावा लागत आहे.

सौभाग्य योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व आजपर्यंत ज्यांच्या घरात वीज पुरवठा नव्हता. अशा कुंटूबियांना वीज जोडणी मुदतीच्या आत देण्यासाठी महावितरण कंपनीने नवीन आलेले .वीजमीटर या योजनेतंर्गत देण्यात येणाऱ्या वीज जोडणीसाठी दिले. त्यामुळे शहरातील फाल्टी वीज मीटर बदलण्याची मोहीम पूर्णपणे ठप्प झाली. अनेक वीज ग्राहक फाल्टी मीटर बदलून द्यावे अशी मागणी गेल्या दिड महिन्यांपासून करीत आहे. मात्र कंपनीकडे मीटरच उपलब्ध नसल्यामुळे व्हरेज बिलांवरच या ग्राहकांची बोळवण केली जात आहे. यामुळे अनेक ग्राहकांना वीज वापर कमी असतानाही वीज बिलाचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. व्हरेज बिलामुळे ग्राहकांत संताप व्यक्त केला जात आहे.

माजी सैनिकांना आवाहन

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक व माजी सैनिक विधवा पत्नी अवलंबित यांना कळविण्यात येत आहे की, ज्या माजी सैनिकांनी स्वयंरोजगारा अंतर्गत दिनांक १४ फेब्रुवारी रोजी किंवा त्यापूर्वी ट्रॅक्टर खरेदी केले आहेत अशा सर्व माजी सैनिकांनी आपले प्रकरण सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी येथे विनाविलंब जमा करावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी केले आहे. सदर प्रकरणांवर अनुदान मिळण्याकरीता प्राधान्याने विचारात घेतले जातील. १५ फेब्रुवारी २०१८ व त्यानंतरची स्वयंरोजगारा अंतर्गत ट्रॅक्टर खरेदीचे प्रकरण स्वीकारण्याबाबतचे निर्देश स्वतंत्ररित्या निर्गमित केले जातील असे शासना मार्फत कळविण्यात आले असल्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): नेहरु युवा केंद्राच्यावतीने दरवर्षी युवा, महिला, क्रीडा मंडळाला जिल्हा युवा मंडळ पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारासाठी युवा मंडळांनी २० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा समन्वयक अरुणा कोचुरे यांनी केले आहे.

१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ या आर्थिक वर्षात युवा मंडळाने युवा विकास क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी ह पुरस्कार दिला जाणार आहे. पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रूपये व सन्मानपत्र असे आहे. अर्जबरोबर मंडळाचे नोंदणी प्रमाणपत्र, घटना, आर्थिक वर्षात केलेल्या कामाचा पुराव, लेखापरिक्षण अहवाल व ग्रामपंचायत कार्यालयाच्या शिफारशीसह सर्व सदस्यांचे आधारकार्ड व जन्मतारीख पुराव्यासह अर्जासोबत सादर करावेत. निवड झालेल्या सर्व सदस्यांचे तालुका जिल्हा पोलिस प्रमुखांचे चारित्र्य प्रमाणपत्रांसह अर्ज सादर करावयाचे आहे. पूर्ण भरलेले अर्ज नेहरु युवा केंद्र, युथ हॉस्टेल इमारत, स्टेशन रोड, बाबा पेट्रोल पंपजवळ, औरंगाबाद, येथे सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते सायं. ५ यावेळेत स्वत: जमा करावेत. या संधीचा युवक, क्रीडा मंडळानी लाभ घ्यावा, असे आवाहन कोचुरे यांनी केले आहे.

अनधिकृत बांधकाम करणाऱ्या दोन बिल्डरांवर गुन्हा

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): वडगाव कोल्हाटीत अनधिकृत रेखांकन व बांधकाम करून विक्री करणाऱ्या दोन बिल्डरांविरूद्ध वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

वडगाव कोल्हाटी येथील गट क्रमांक ९ व १० मध्ये मारुती मेंढे व दया मोहिते यांनी न्यू जगदंबा हौसिंग सोसायटीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात भुखंड पाडून या भुखंडाची विक्री केली आहे. तसेच निवासी गाळे बांधत असल्याची तक्रार चेनराज फुलपगार यांनी सिडको प्रशासनाकडे केली होती. या तक्रारीची दखल घेत सिडको प्रशासनने गट नंबर ९ व १० मध्ये पाहणी केली असता या ठिकाणी सिडकोची परवानगी न घेता अनाधिकृतपणे बांधकाम केल्याचे आढळून आले. त्यामुळे सिडको प्रशासनाकडून अनधिकृत बांधकाम प्रकरणी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी मारुती मेढे व इतरांशी संपर्क साधुनही त्यांनी नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, दोघांनीही अनाधिकृत बांधकामासंदर्भात कुठलाही खुलासा व कागदपत्रे सादर न केल्यामुळे मारुती मेंढे व दया मोहिते यांच्यावर सोमवारी सिडकोचे सहाय्यक वसाहत अधिकारी गजानन साटोटे यांनी एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या तक्रारीवरुन बिल्डर मारुती मेंढे व दया मोहिते या दोघांविरुध्द एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय घेरडे करीत आहेत.

उपजिल्हाधिकाऱ्यांनी घेतला ॲट्रॉसिटी गुन्ह्यांचा आढावा

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): अनुसूचित जाती,जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमाखाली (ॲट्रॉसिटी) दाखल गुन्ह्यांचा तपास, कायदेशीर प्रक्रियेबाबत निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर यांनी आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक जाधवर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवाजी शेळके, अशासकीय सदस्य उत्तमराव गुडेकर, मनोज भारस्कर, चंद्रकांत जाधव, प्रदीप जाधव, शासकीय सदस्य सहाय्यक पोलिस निरीक्षक (गुन्हे शाखा) एस. एम. भुजंग, एस.डी. पठाण आदींची उपस्थिती होती. अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ व सुधारित अधिनियम १९९५ च्या अंतर्गत घडलेल्या गुन्हांच्या प्रकरणांमध्ये ३१ ऑक्टोबर २०१८ पर्यंतच्या दाखल गुन्हांचा तपशील जाधवर यांनी जाणून घेत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ व सुधारित अधिनियम १९९५ अंतर्गत १ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान शहरात १, ग्रामीण भागात ४ अशा एकूण ५ गुन्हांची नोंद करण्यात आली असल्याचे शेळके यांनी सांगितले.

खाजगी बसवर कारवाईसाठी मोहीम

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): खाजगी बसेस चालक, मालक यांच्यावर कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

जादा भाडे आकारणाऱ्या एकूण ११ खाजगी बसेसवर ३ नोव्हेंबर रोजी कारवाई करून पैकी ४ बसेसवर ताब्यात घेण्यात आल्या.

मुख्य बसस्थानक व शहरात खाजगी एसटी थांब्याच्या ठिकाणी कार्यालयादारे बस प्रवाशी भाडे फलक लावण्यात आलेले आहे. जास्तीची भाडे आकारणी केल्यास प्रवाशांनी टोल फ्री क्र. ०२२–६२४२६६६६ येथे तक्रारी नोंदवावी, असे आवाहन विभागाने केले आहे.

रस्त्यांची दुरवस्था

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): वाळूज महानगर व परिसरातील काही गावांमध्ये रस्त्यांची दुरवस्था झाली असून यामुळे वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला वाहने नादुरूस्त अवस्थेत दिसून येतात. वाळू वाहतुकीमुळे काही ठिकाणच्या रस्त्यांची पुर्ण वाट लागली आहे. मोठ–मोठे खड्डे पडल्याने वाहन धारकांना कसरत करावी लागत आहे. तसेच खडुळधातील खडी रस्त्यावर पसरल्याने किरकोळ अपघाताच्या घटना घडत आहे. रस्ता दुरावस्थेचा सर्वाधिक फटका दुचाकी व इतर वाहनांव्दारे वाहतूक करणाऱ्यांना त्रास होत आहे.

तलवारीचा धाक दाखविणाऱ्यास अटक

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): रेल्वेस्टेशन एमआयडीसी परिसरात रस्त्यात उभे राहून तलवारीचा धाक दाखवणाऱ्याला सातारा पोलिसांनी गजाआड केले. कर्नलसिंग तारासिंग कल्याणी (वय ३०, रा. छोटा मुरलीधरनगर) असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. सातारा पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कल्याणी हा रस्त्यात उभा राहून लोकांना तलवारीचा धाक दाखवत असल्याची माहिती सातारा पोलिसांना मिळताच पोलिस उपनिरीक्षक अंगेले आणि यांच्यासोबत पोलिस कर्मचारी ससाणे, नलावडे आणि ढोले गेले असता त्यांना कल्याणी त्या ठिकाणी तलवार घेऊन उभा दिसला. पोलिसांनी त्यांना अटक करण्याचा प्रयत्न केला असता त्याने पोलिसांशी धक्काबुक्की केली. मात्र, पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. त्याला गाडीत बसवत पोलिस ठाण्यात नेले. त्याच्याकडून एक मोठी आणि छोटी तलवार जप्त केली.

कर्नलसिंग कल्याणी याने प्रथम उडवाडवीची उत्तरे दिली;परंतु पोलिसांनी त्यांना खाक्या दाखवताच त्यांनी त्यांचा गुन्हा कबूल केला. पुढील तपास सहायक फौजदार नारायण बऱ्हाटे करत आहेत.

खंडणी मागणारे दोघे अटकेत

औरंगाबाद,दि.१० (सांजवार्ता ब्युरो): तुमच्या ऑईल कंपनीतून निघणाऱ्या धुरामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत आहे. प्रदूषण महामंडळाची कारवाई थांबवायची असेल तर महिन्याला एक लाख रुपये द्यावे लागतील, अशी धमकी देत खंडणी मागणाऱ्या इरफान शहा हारुण शहा (वय २७, रा. नारेगाव) व व शेख रशीद शेख महेमूद (वय ४०, रा. पडेगाव) या दोघांना जिन्सी पोलिसांनी मंगळवारी अटक केली. त्यांचे दोन साथीदार मात्र पसार झाले.

'स्पेशल २६' चित्रपटाप्रमाणे हे दोघे आम्ही मोदी सरकारची खास टीम असल्याचे सांगत व्यापारी, व्यावसायिकांना धमकावून लुटत होते.

कलीम कुरेशी छोटू कुरेशी (वय ३८, रा. कैसर कॉलनी) यांची वरुड काझी परिसरात ऑईल कंपनी आहे. मंगळवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास आरोपी इरफान त्याचा साथीदार रशीद व इतर दोघांना घेऊन पांढऱ्या रंगाच्या टाटा सुमोतून कुरेशी यांच्या घरासमोर आले.

रशीद व इरफान त्यांच्या घरात गेले. इरफानने स्वयंसेवी संस्थेचा सदस्य असल्याचे सांगत तुमच्या कंपनीतून मोठ्या प्रमाणात धूर निघत असून प्रदूषण महामंडळाकडून कारवाई होण्याची शक्यता आहे. ती होऊ द्यायची नसेल तर महिन्याला एक लाख रुपये द्यावे लागतील, अशी मागणी केली. कुरेशी यांनी त्याला थेट घरात कसे आला, अशी विचारणा केली असता त्याने आमची स्वयंसेवी संस्था असून आम्ही काहीही करू शकतो, असे सांगितले.